ला.प्र.वि.नंदुरबार कॅम्प नवापुर
दिनांक १९/१०/२०२०.

:–प्रेस नोट :–

**इलोसे योगेश वामनराव भामरे वय – ३८ पद – तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, (कंत्राटी) नेमणुक – तालुका कृषी अधिकारी कार्यालय, नवापुर जि.नंदुरबार यांना ८,७५०/–रुपये लाचेची मागणी करुन ती स्विकारतांना रंगेहात पकडले बाबत**

| | |
|---|---|
| घटक | नंदुरबार |
| गुन्हा नोंद क्रमांक | कार्यवाही चालु आहे. |
| कलम | लचलुचपत प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ (संशोधन सन २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | इलोसे योगेश वामनराव भामरे वय – ३८ पद – तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, (कंत्राटी) नेमणुक – तालुका कृषी अधिकारी कार्यालय, नवापुर जि.नंदुरबार |
| मगणी केलेली लाचेची रक्कम | ८,७५०/–रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ८,७५०/–रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील मुळ तक्रारदार हे शेतकरी असुन त्यांचे शेतकरी गटांसाठी शासनामार्फत मोफत बी बियाणे व खते देण्याची योजना आहे. त्यासाठी १० ते १५ शेतकरी एकत्र येवुन गट स्थापन करुन त्याचे कायदेशीर रजिस्ट्रेशन करुन त्याची यादी तयार करुन शेतकरी उत्पादक कंपनी यांना सादर करुन सदर कंपनी मार्फत जिल्हा पातळीवर तालुका कृषी अधिकारी नंदुरबार यांचेकडेस सदर बी बियाणे, निविष्ठा असे येतात संबंधीत कार्यालयाकडुन तालुका पातळीवर आत्मा प्रकल्प कार्यालयाकडे वाटपासाठी पाठविले जाते त्याप्रमाणे आमचे गटाप्रमाणे असलेल्या यादीतील लोकांना सदर बी बियाणे, निविष्ठा यांचे मोफत वाटप केले जाते.<br><br>त्याप्रमाणे आमचा समृध्दी शेती उत्पादक गट पिंपरान पोस्ट पाटीबेडकी ता. नवापुर जि. नंदुरबार असा असुन त्यात एकुण १६ शेतकरी असुन सदर गट कायदेशिर रजिस्ट्रेशन केलेला आहे. सदर गटाचा तक्रारदार हे अध्यक्ष आहेत त्यांचे गटास वरील प्रमाणे बी बियाणे, निविष्ठा असे वाटप झालेले आहे त्याप्रमाणे त्यांनी सदर बी बियाणे शेतीत पेरणी केलेले आहे ५ ते ७ दिवसापुर्वी आत्मा प्रकल्प कार्यालय नंवापुर येथील कर्मचारी श्री. योगेश भामरे यांनी तक्रारदार यांचे मोबाईलवर फोन करुन सांगितले की, तुमच्या गटातील सर्व शेतकऱ्यांकडुन प्रत्येकी २५०/– रुपये प्रमाणे १६ शेतकऱ्यांचे ४०००/– रुपये मला आणुन दे नाहीतर पुढील रब्बी सिझन मधील पिकांचे बी बियाणे मी तुम्हाला मोफत मिळु देणार नाही असे सांगुन त्यांनी माझे कडेस लाचेची मागणी केली आहे परंतु मला त्यांना लाच दयावयाची इच्छा नाही.<br><br>आमचे गटातील सर्व शेतकऱ्यांची श्री. योगेश भामरे आत्मा प्रकल्प कार्यालय नवापुर यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नाही त्यांनी मागणी केलेली रक्कम ही कोणतीही शासकीय फी नसुन ती लाचच आहे याबाबत माझी पक्की खात्री झालेली आहे. तरी त्यांचेवर कायदेशिर कारवाई होणेस विनंती आहे. कर्मचारी श्री. योगेश भामरे आत्मा प्रकल्प कार्यालय नवापुर यांचेत व माझेत कोणत्याही प्रकारचा देवाण – घेवाणीचा व्यवहार अगर वाद नाही तरी त्यांचेवर कायदेशिर कारवाई होणेस विनंती आहे. बाबत तक्रारदार यांना लाच म्हणुन दयावयाची इच्छा नसल्याने त्यांनी अॅकब्यु, नंदुरबार कार्यालयास दिनांक १९/१०/२०२० रोजी लेखी तक्रार दिलेवरुन पडताळणी दरम्यान आरोपी लोकसेवक भामरे यांनी सांगितले की, तुमचे सर्व ३५ शेतकऱ्यांचे २५०/– रुपये प्रमाणे मला एकुण ८,७५०/– रुपये आणुन दया असे सांगुन लाचेची मागणी केली व मागणी केलेली रक्कम मला लवकर आणुन दे मला बाहेरगावी जावयाचे आहे वरीलप्रमाणे |

Scanned with CamScanner

| | |
|---|---|
| | लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले होते. त्यावरुन आरोपी लोकसेवक भामरे, यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम आज दिनांक १९/१०/२०२० रोजी पंच व साक्षीदार यांच्या समक्ष स्टेट बॅक ऑफ इंडीया, नवापुर येथे रोडावर सार्वजनिक ठिकाणी स्विकारली असुन त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे म्हणुन गुन्हा. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्या येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोवसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार कार्यालयास संपर्क करावा.

संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नंदुरबार कार्यालय
संकेतस्थळ : acbnandurbar@gmail.com
ई–मेल : dyspacbnandurbar@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार/ॲप्लीकेशन : acbnandurbar@gmail.com
टोल फ्री कमांक : १०६४
दुरध्वनी कमांक : ०२५६४– २३०००९,२३१००९
व्हॉटस ॲप क. : ९५९४४०१७७७

19.10.2020

(शिरीष.टी.जाधव)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रबिंधक विभाग,नंदुरबार

पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग * नंदुरबार *

Scanned with CamScanner